पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक- २०/०५/२०२०

## बनावट 'ई' पासच्या साहाय्याने जिल्हा सिमा ओलांडण्याचा प्रयत्न करणाऱ्या व बनावट 'ई' पास तयार करणाऱ्या इसमांवर गुन्हा दाखल

कोरोना साथरोग विषाणूच्या फैलावाच्या पार्श्वभुमीवर साथरोग अधिनियम १८९७ चे तसेच राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियमाची अंमलबजावणी सुरु आहे. त्यानुसार कोरोनाचा प्रादुर्भाव वाढु नये म्हणुन वेळोवेळी शासनाकडुन आदेश निर्गमित करण्यात येतात. त्यामध्ये जमावबंदी, जिल्हाबंदी इत्यादी बाबी अंतर्भुत आहेत. मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सा़े. यांच्या मार्गदर्शनाखाली देसाईगंज पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जिल्हा सीमा ब्रम्हपुरी रोड वैनगंगा नदीचे पुलाजवळ, लाखांदुर रोड सावंगीमध्ये, अर्जुनी रोड फॉरेस्ट नाक्याजवळ या तीन्ही रोडवर नाकाबंदी लावण्यात आलेली आहे.

आज रोजी ब्रम्हपुरी रोड वैनगंगा नदीचे पुलाजवळ नाकेबंदी दरम्यान एक इसम देसाईगंजकडुन ब्रम्हपुरी जाणेकरीता मो.सा.क्रमांक- एम.एच.३३ एल ४२१० या दुचाकीने येताच त्यास गडचिरोली पोलीस दलाच्या जवानांनी थांबवुन विचारपुस केली असता, त्याने त्याचे नांव मुकेश दुर्योधन राऊत, वय ३१ वर्ष रा. जुनी वडसा असे सांगीतले व त्याच बरोबर त्याने त्याचेजवळ " ई " पास असल्याचे सांगुन " ई " पास दाखविले. पोलीस जवानांना शंका आल्याने जवानांनी " ई " पास QR & Barcode Scanner या मोबाईल ॲपवर " ई " पास चेक केले असता, तो बनावट असल्याचे निदर्शनास आले. त्याच्याकडे अधिकची चौकशी केली असता सदर पास हा आरोपीने संतोष बकाराम कोरे, वय ४४ वर्ष व्हिजन कॉम्पुटर देसाईगंज यांचे दुकानात सदर पास बनवल्याचे कबुल केले. यावरुन आरोपी १) मुकेश दुर्योधन राऊत, वय ३१ वर्ष रा. जुनी वडसा, २) संतोष बकाराम कोरे, वय ४४ वर्ष रा. हनुमानवार्ड देसाईगंज यांचे विरुध्द पोलीस स्टेशन देसाईगंज येथे अपराध क्रमांक ०१३०/२०२० कलम ४१९, ४६५, ४६८,४७१,३४,१८८ भादंविसह कलम ६६(सी), ६६(डी) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक, प्रदिप रामनाथजी लांडे सा. यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि रुपाली बावणकर, पोशि संतोष नागरे, पोना श्रीकांत आलाम, श्री. साळवे, भुमीअभिलेख, श्री. उईके आरोग्य विभाग, श्री. आर. एम. मेन्ढे, शिक्षक, नगरपरिषद देसाईगंज यांनी केलेली आहे. सदर गुन्हयाचा तपास सुरु असुन मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, श्री. जयदत्त भवर साहेबांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, प्रदिप रामनाथजी लांडे सा. करीत आहेत.